# नमुना 2

अनुदानित तत्वावर
(मराठी,इंग्रजी,हिंदी,उर्दू,तामिळइत्यादीमाध्यम)

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग(प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/736/2019
पुणे1दिनांक- /2/2019 29/3/19

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

डी.सी.मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे संचलित महात्मा ज्योतिराव फुले हायस्कूल मुलींचे, ८९६ नाना पेठ, पुणे-४११००२

विषय:-बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009यांच्या कलम18च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011याचा नियम11,पोट नियम(4)अन्वये शाळांना मान्यता प्रमाण पत्र देणेबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे. मी शिक्षणाधिकारी(प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद,पुणे दिनांक 1 एप्रिल 2016 पासून ते दिनांक-31मार्च 2019 पर्यंतच्या कालावधीसाठी इ. 5 वी ते 8 वी करिता डी.सी.मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे संचलित महात्मा ज्योतिराव फुले हायस्कूल मुलींचे, ८९६ नाना पेठ, पुणे-४११००२ तात्पुरती मान्यता देत आहे

वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ताआठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

1.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाअधिनियम 2009 (जोडपत्रएक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम 2011 (जोडपत्रदोन) शाळा पालन करील.

2.शाळांना नजिक च्यादुर्बल घटकातीलआणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान25% मर्यादे पर्यंत प्रवेश देईलआणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतुआणखी असेकी,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील याप्रमाणेअनुपालन करण्यात येईल.

3.परिच्छेद3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेलाअधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँ कखाते देण्यातयेईल

4संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणा रनाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालका सभाग पाडणारनाही.

5.कोणत्याही बालकासवयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात,किंवावंश,जन्मठिकाणकिंवायापैकीकोणत्याही कारणास्तव,शाळेमध्येप्रवेशनाकारतायेणारनाही.

6(एक)शाळेतप्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेतअसेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षणपूर्णहोई पर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

7(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन)कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच)विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा)अधिनियमाच्या कलम 23(1) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारणकरणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हताधारणन करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तिची कर्तव्य शिक्षक पारपाडतील आणि (आठ)शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

Head Mistress
Mahatma Jyotirao Phule
High School For Girls
896, Nana Peth Pune-411002

८. शाळा समुचित प्राधिकरणा नेनिर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.
शाळा,अधिनियमाच्या कलम19 मध्ये विहीतकेल्याप्रमाने शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

शाळा अधिनियमाच्या कलम19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेतउपलब्धअसलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ:- 2091 चौ.फुट.
- एकूण बांधकामाचेक्षेत्र.:- 630 चौ.फुट.
- खेळाच्यामैदानाचेक्षेत्रफळ.:- 1461.6 चौ.फुट.
- वर्गखोल्यांचीसंख्या.:- 04
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली.:-02
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह आहेत काय?:-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | 00 | 04 |
| मुताऱ्या | 00 | 00 |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा:आहे.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर.:- लागू नाही.
- अध्यापन अध्ययनसाहित्य/खेळ व क्रिडा विषयक सामग्री/ग्रंथालययांचीउपलब्धता.:-आहे
- वाचनसाहित्यविनासायासउपलब्ध.:-आहे.(ग्रंथालय पुस्तक संख्या- 450 नियतकालिक/वर्तमानपत्र:- )

मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरातकिंवाइतरत्रचालवितायेणारनाहीत.

१ शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

२ शाळा सोसायटी नोंदणी नियम1860(1860चा21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थे मार्फत चालविण्यात येतआहे.

३ शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्या करिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

४ शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखाविवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखाविवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हाशिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

५ तुमच्या शाळेला मिळालेला मान्यतासांकेतांक माध्य./अनु./म./एस.एस.सी./पी.एम.सी./ /2016-19 असा आहे तसेच आपल्या शाळेचा **U-DISENo.27251800510** हा आहे.या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावायाची नोंद घ्यावी.

६ मा.शिक्षणसंचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवाशाळेच्या कामकाजातील त्रुटी दूरकरण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईलअशा सूचनांचे पालन करावे.

७ संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

८ जोडपत्रतीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्याआहेत.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणेजिल्हापरिषद,पुणे

**Head Mistress**
**Mahatma Jyotirao Phule**
**High School For Girls**
**890, Nana Peth Pune 411002**